**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

अधिवेशनाचा शुभारंभ " वंदे मातरम् या गीताच्या समूह गायनाने झाला.

**पृ.शी./मु.शी.** सदस्यांच्या राजीनाम्याची घोषणा

**सभापती** : महाराष्ट्र विधान परिषद नियम 266 (5) च्या तरतुदींना अनुसरुन मी सभागृहास कळवितो की, महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा विधान परिषदेवर निवडून आलेले -

1) श्री.किरण जगन्नाथ पावसकर, वि.प.स. यांनी महाराष्ट्र विधान परिषदेतील त्यांच्या जागेचा दिलेला राजीनामा शुक्रवार, दिनांक 7 जानेवारी, 2011 रोजी मध्यान्होत्तर स्वीकारला आहे.

2) श्री. संजय सतीशचंद्र दत्त, वि.प.स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेतील त्यांच्या जागेचा दिलेला राजीनामा शुक्रवार, दिनांक 11 मार्च, 2011 रोजी मध्यान्हपूर्व स्वीकारला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : सदस्यांचा परिचय व शपथविधी

श्री.अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, राज्यपालांनी नामनियुक्त केलेल्या श्रीमती विद्या अजित चव्हाण यांचा आपणास व आपल्या मार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

श्रीमती विद्या अजित चव्हाण यांनी शपथ घेतली.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, विधान सभा सदस्यांव्दारा निर्वाचित श्री.किरण जगन्नाथ पावसकर यांचा आपणास व आपल्या मार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

( शिवसेनेचे सन्माननीय सदस्य सभात्याग करतात )

श्री.किरण जगन्नाथ पावसकर यांनी शपथ घेतली.

नंतर श्री.सरफरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार : सभापती महोदय, नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्थाव्दारा निर्वाचित सदस्य श्री. जयवंतराव पुंडलिकराव जाधव यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. जयवंतराव पुंडलिकराव जाधव यांनी प्रतिज्ञा केली.

(सभागृहाबाहेर गेलेले शिवसेनेचे सर्व माननीय सदस्य सभागृहामध्ये आगमन करतात.)

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आज या सभागृहामध्ये एक ऐतिहासिक नोंद होत आहे. या सभागृहामध्ये एका माननीय सदस्यांच्या राजीनाम्याची घोषणा करण्यात आली व त्याच माननीय सदस्यांनी या सभागृहामध्ये आज पुन्हा शपथ देखील घेतली. अशाप्रकारे या सभागृहाच्या इतिहासामध्ये एक वेगळी नोंद झालेली आहे.

----

**पृ.शी./मु.शी.** : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत पटलावर ठेवणे

सह सचिव : महोदय, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत आज, दिनांक 14 मार्च, 2011 रोजी राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत मी सभागृहापुढे ठेवतो.

**सभापती** : विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : सोबत जोडलेले अभिभाषण छापावे.)

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृशी.** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन

**मु.शी.** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन करणारा श्री. भाई जगताप यांचा प्रस्ताव.

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

"राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधान परिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

श्री. विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अशोक उर्फ भाई जगताप यांनी मांडलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास मी अनुमोदन देतो.

**सभापती** : प्रस्ताव असा आहे की :-

"राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधान परिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

गुरुवार, दिनांक 17 व शुक्रवार, दिनांक 18 मार्च, 2011 रोजी या प्रस्तावावर चर्चा होईल.

या प्रस्तावास कोणत्याही सदस्यांना सुधारणा सुचवावयाच्या असतील त्यांनी त्या बुधवार, दिनांक 16.3.2011 रोजी सायंकाळी 5 वाजेपर्यन्त कक्ष क्रमांक 17, विधान भवन, मुंबई येथे द्याव्यात.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सभागृहाच्या कामकाजासंबंधी

**सभापती** : सभागृहाच्या आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये शेवटी दाखविण्यात आलेली शोकप्रस्तावाची बाब अगोदर घेण्यात यावी अशी लेखी विनंती माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी माझ्याकडे केली आहे. त्यामुळे आता आपण शोकप्रस्ताव घेऊ व त्यानंतर उर्वरित कामकाज घेऊ.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : शोक प्रस्ताव

**मृ.शी.** : भारतरत्न, स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी व ज्येष्ठ नाटककार श्री.प्रभाकर विष्णूशास्त्री पणशीकर, ॲड.गुरुनाथ शांताराम कुलकर्णी, वि.प.स.,श्री.रमेश बालमुकुंदजी गुप्ता, माजी वि.प.स.यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, भारतरत्न,स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी व ज्येष्ठ नाटककार श्री.प्रभाकर विष्णूशास्त्री पणशीकर,ॲड.गुरुनाथ शांताराम कुलकर्णी, वि.प.स.,श्री.रमेश बालमुकुंदजी गुप्ता,माजी वि.प.स.यांच्या दु:खद निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"भारतरत्न, स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी व ज्येष्ठ नाटककार श्री.प्रभाकर विष्णूशास्त्री पणशीकर, ॲड.गुरुनाथ शांताराम कुलकर्णी,वि.प.स., श्री.रमेश बालमुकुंदजी गुप्ता,माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

भारतीय संगीताची ख्याती सातासमुद्रापार नेऊन ठेवणारे आणि भारत देशाच्या संगीत क्षितिजावर स्वत:चे अढळस्थान निर्माण करणारे किराणा घराण्याचे ज्येष्ठ गायक, भारतरत्न, स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी यांचा जन्म दिनांक 14 फेब्रुवारी 1922 रोजी कर्नाटकातील धारवाड जिल्ह्यात रोण येथे झाला.

कै.जोशी यांना लहानपणापासूनच गायनाची विलक्षण आवड होती.गाणे शिकायचे या ध्यासापायी त्यांनी वयाच्या 11 व्या वर्षी घर सोडले.ग्वाल्हेर, लखनौ, रामपूर, जालंदर येथे त्यांनी गायनाचे धडे घेतले.सवाई गंधर्वाच्या मार्गदर्शनाखाली भीमसेनजींनी शास्त्रीय संगीताचे अध्ययन केले.किराणा घराण्याची गायकी आत्मसात करुन त्यांनी पुरीया, मुलतानी या रागांवर हुकमत मिळविली.आपल्या सुमधुर स्वरांनी केवळ भारतातच नव्हे तर परदेशातही हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत सादर करणारे पंडित भीमसेन जोशी हे पहिलेच भारतीय होते. त्यांनी ललित, भटियार यासारख्या रागांची निर्मिती केली.देशाच्या सांस्कृतिक एकात्मतेचे ते प्रतीक होते. भारतीय शास्त्रीय संगीतातील त्यांचे स्थान अढळ आहे. त्यांनी अनेक कलावंतांना सवाई गंधर्व महोत्सवाचे मानाचे व्यासपीठ मिळवून दिले.

कै.जोशी यांचे गायन म्हणजे जगभरातील कोट्यावधी संगीत रसिक जनतेची मने रिझविणारी एक महान शक्ती आहे.त्यांच्या अभिजात ख्याल गायकीने भारतमातेच्या सांस्कृतिक,

श्री.अजित पवार . . . .

श्रीमंतीला जणू सोनेरी किनार लाभली होती. शास्त्रीय संगीतावर भीमसेनी मोहोर उठवत 'माझे माहेर पंढरी' या अभंगातून घराघरात विठ्ठलाचे दर्शन दिले तर 'इंद्रायणी काठी देवाची आळंदी','रम्य ती स्वर्गाहून लंका','टाळ बोले चिपळीला नाच माझे संग','मिले सुर मेरा तुम्हारा, तो सुर बने हमारा' अशा एकाहून एक गीतांनी रसिकांच्या मनावर अधिराज्य केले आहे.संगीताच्या क्षेत्रातील मोठ्या योगदानाबद्दल त्यांना "संगीत नाटक ॲकॅडेमी पुरस्कार",जयपूर येथील गंधर्व महाविद्यालयाने "संगीताचार्य","पुण्यभूषण पुरस्कार","स्वरभास्कर पुरस्कार","तानसेन पुरस्कार" तसेच पुणे येथील टिळक विद्यापीठाने व गुलबर्गा विद्यापीठाने "डी.लिट" ही पदवी देऊन गौरविले तर भारत सरकारने 1972 मध्ये"पद्मश्री",1985 मध्ये "पद्मभूषण" दिनांक 04 नोव्हेंबर 2008 रोजी सर्वोच्च मानाचा "भारतरत्न" किताब देवून त्यांचा सन्मान केला होता.

अशा या गेल्या सहा दशकाहून अधिक काळ आपल्या सुमधुर स्वरांनी रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या महान स्वरभास्कराचे सोमवार दिनांक 24 जानेवारी 2011 रोजी दु:खद निधन झाले.

. . . .सी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.अजित पवार . . . .

मराठी रंगभूमीवरील नटसम्राट, ज्येष्ठ रंगकर्मी, नटश्रेष्ठ प्रभाकर विष्णूशास्त्री पणशीकर यांचा जन्म 14 मार्च 1931 रोजी मुंबईतील फणसवाडी येथे झाला.

कै.पणशीकर यांना लहानपणापासून नाटकामध्ये काम करण्याची विलक्षण आवड होती.त्यांनी अभिनयाच्या 50 वर्षाच्या कारकिर्दीमध्ये 41 नाटकांचे 8101 प्रयोग केले. त्यांची 'भटाला दिली ओसरी, 'तो मी नव्हेच','इथे ओशाळला मृत्यू"अश्रूंची झाली फुले' 'थँक्यु मिस्टर ग्लाड' 'जिथे गवतास भाले फुटतात','मोहिनी','वीज म्हणाली धरतीला', 'फक्त एकच कारण', 'महाराणी पद्मिनी','तीन लाखाची गोष्ट','तो राजहंस एक','अंधार माझा सोबती','किमयागार'ही नाटके मराठी रंगभूमीवर अजरामर ठरली. तसेच 'तुझी वाट वेगळी','मदनाची मंजिरी','सुवर्णतुला','कट्यार काळजात घुसली', 'राजसंन्यास','संत तुकाराम','होनाजी बाळा', ही त्यांची संगीत नाटकेही गाजली.आपल्या विलक्षण अभिनयाने 'तो मी नव्हेच' या नाटकातील 'लखोबा लोखंडे','अश्रूंची झाली फुले' मधला "प्राध्यापक विद्यानंद" 'येथे ओशाळला मृत्यू' मधील 'औरंगजेब' अशा एकाहून एक जबरदस्त भूमिकांमधून अजरामर झालेले प्रभाकर पणशीकर यांनी "तो मी नव्हेच" या नाटकात पाच वेळा वेषांतर करुन केलेल्या वेगवेगळ्या भूमिका तर मराठी रंगभूमीवरील मैलाचे दगड ठरल्या.

कै.पणशीकर यांनी रंगभूमीला दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना "नटवर्य दत्ताराम पुरस्कार", "जागतिक मराठी परिषद पुरस्कार","नाट्यगौरव पुरस्कार","संगीत नाटक अकादमी पुरस्कार", "नटसम्राट बालगंधर्व स्मृती पुरस्कार","नटश्रेष्ठ केशवराव दाते पुरस्कार","आचार्य अत्रे पुरस्कार", "महाराष्ट्र गौरव पुरस्कार","महाराष्ट्र भूषण पुरस्कार","जीवन गौरव पुरस्कार"अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले होते.

कै.पणशीकर यांनी 1985 मध्ये नागपूर व 1986 मध्ये पुसद येथे झालेल्या नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही भूषविले होते.

अशा या ज्येष्ठ नाटककाराचे गुरुवार दिनांक 13 जानेवारी 2011 रोजी दु:खद निधन झाले.

----

यानंतर कु.थोरात . . . .

श्री. अजित पवार......

कै. ॲड. गुरुनाथ शांताराम कुलकर्णी यांचा जन्म 7 मार्च 1941 रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड तालुक्यातील मोंड येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए., एलएल.बी. पर्यंत झाले होते.

कै. कुलकर्णी यांनी सुरुवातीस काही काळ मुंबई उच्च न्यायालयात वकिली केली होती. माळगांव पंचक्रोशी एज्युकेशन सोसायटी, तसेच सिंधुदुर्ग सांस्कृतिक केंद्र, सर्फोजी राजेभोसले भरतनाट्यम ट्रेनिंग ॲंड रिसर्च सेंटर, मुंबई तसेच अकॅडमी ऑफ इंडियन आर्ट ॲंड कल्चर या संस्थांचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कार्य केले होते.

कै. कुलकर्णी यांनी नॅशनल स्टुडंटस युनियन, मुंबई तसेच मुंबई प्रदेश युवक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष, मुंबई प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सह कार्यवाह, अखिल भारतीय युवक कॉंग्रेसचे तसेच महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस म्हणून कार्य केले होते. तसेच त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या स्थापनेपासून पक्षाचे सरचिटणीस म्हणूनही कार्य केले होते. 1974 मध्ये बर्लिन, जर्मनी (पूर्व) येथील जागतिक युवक महोत्सवात भारताचे प्रतिनिधीत्वही त्यांनी केले होते.

कै. कुलकर्णी हे अत्यंत अभ्यासू वृत्तीचे होते. पक्ष संघटना हा त्यांचा आवडीचा विषय होता. निर्मळ मन पण कठोर शिस्त हा त्यांचा बाणा होता. गुरुजी म्हणून ते सर्वांना परिचित होते.

कै. कुलकर्णी हे 2002 व 2008 असे दोन वेळा महाराष्ट्र विधानपरिषदेवर राज्यपालाद्वारे नामनियुक्त सदस्य म्हणून निर्वाचित झाले होते.

अशा या समाजसेवकाचे बुधवार दिनांक 12 जानेवारी 2011 रोजी दु:खद निधन झाले.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

कै. रमेश बालमुकुंदजी गुप्ता यांचा जन्म 19 ऑक्टोबर 1944 रोजी नागपूर जिल्ह्यात नरखेड येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए. पर्यंत झाले होते.

कै. गुप्ता यांनी प्रेरणा शिक्षण संस्था, विदर्भ साहित्य संघ, संजय गांधी निराधार योजना समिती, विदर्भ किसान सेल व श्रीकृष्ण मंदिर ट्रस्ट, नरखेडचे अध्यक्ष तसेच जिनिंग व प्रेसिंग संस्था, वसंतदादा संत्रा प्रकिया संस्था, नरखेड, न्याय सल्लागार समिती, काटोल, कृषी उत्पन्न बाजार समिती, नरखेड, नागपूर जिल्हा नियोजन समिती, राज्य ग्रंथालय संघ, ग्राहक संरक्षण परिषद, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य तसेच गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळ, नागपूरचे उपाध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते.

कै. गुप्ता यांनी सतत 25 वर्षे नरखेड नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पद भूषविले होते.

कै. गुप्ता 1991 मध्ये नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे बुधवार दिनांक 26 जानेवारी 2011 रोजी दु:खद निधन झाले.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कु. थोरात/

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय श्री. अजितदादा पवार, यांनी या ठिकाणी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्याचे समर्थन करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी यांचे मधल्या काळात निधन झाले आहे. आपल्या स्वरप्रभेद्वारे संपूर्ण संगीत विश्वावर तब्बल सहा दशके अधिराज्य गाजवणारे व "झाले बहु होतील बहु परि या सम हा " असे ज्यांच्याबद्दल बोलले जाते असे ते स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी यांच्या बद्दल प्रथम मी या ठिकाणी बोलू इच्छितो.

सभापती महोदय, किराणा घराण्यातील गाणे जगभर पोहोचविण्याचे कार्य त्यांनी केले. मराठी, हिंदी, कानडी या तिन्ही भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते व त्यात त्यांनी वर्चस्व गाजविले.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

'माझे माहेर पंढरी', 'पंढरी निवास' या सारखी भजने त्यांनी घराघरात पोहोचविली.

कर्नाटकातील गदग येथे दिनांक 4 फेब्रुवारी, 1922 रोजी जन्मलेल्या पंडितजींनी केवळ संगीताच्या वेडापायी वयाच्या अकराव्या वर्षी घरातून पळून जाऊन ग्वाल्हेरमध्ये आश्रय घेतला. पंडित भीमसेन जोशी यांना पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, संगीताचार्य आणि भारतरत्न या देशातील सर्वोच्च नागरी किताबाने सन्मानित करण्यात आले. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतावर त्याचबरोबर कर्नाटक संगीतावर त्यांचे प्रभुत्व होते. या दोन्ही शाखांमध्ये आतापर्यंत लीलया विहार करुन अनेक मैफिली गाजविणारे ते एकमेव गायक होते. सचिन तेंडुलकरने जसे कोवळ्या वयात क्रिकेट विश्वच हादरुन टाकावे त्याप्रमाणे पंडित भीमसेन जोशींनी देखील अवघ्या एकोणीसाव्या वर्षी पहिली जाहीर मैफील घेतली व त्या नंतर त्यांना मैफिलीचा राजा असे संबोधले जाऊ लागले. सवाई गंधर्वमधील पंडितजींचे गायन ऐकण्यासाठी केवळ पुणेकरच नव्हे तर देश विदेशातील रसिक मंडळी अक्षरश: वेडी होत होती. पंडित भीमसेन जोशी यांनी मराठी बरोबरच कानडी, हिंदी, बंगालीमध्ये आपल्या रचना सादर केल्या. त्यांची संतवाणी जितकी लोकप्रिय झाली तितकीच कानडी दासवाणी कर्नाटकातील लोकांनाही भावली. त्यांनी मराठी व कानडी नाटकांमध्ये भूमिकाही केल्या. त्यांचे गायक व नायक असे दुहेरी व्यक्तिमत्व होते. या जगात आलेल्या प्रत्येकाला कधीनाकधी जावेच लागते. पण काहींनी आपल्यातून कधीच जाऊ नये असे आपल्याला वाटते. स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी हे असेच एक व्यक्तिमत्व होते. ते गेल्याने प्रत्येक संगीत रसिकाची स्थिती त्यांच्याच गाण्याच्या शब्दात सांगावयाचे तर "आता कोठे धावे मन" अशी झाली आहे. पंडित भीमसेन जोशी यांच्या निधनाने एक संगीतसूर्य मावळला आहे. या महान स्वरभास्कराचे सोमवार, दिनांक 24 जानेवारी, 2011 रोजी दु:खद निधन झाले.

सभापती महोदय, ज्येष्ठ नाटककार कै. प्रभाकर विष्णूशास्त्री पणशीकर यांच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे सहा दशकाहून अधिक काळ रंगभूमीवर आपल्या भारदस्त अभिनयाचा ठसा उमटविणारे ज्येष्ठ नाट्यकर्मी प्रभाकर विष्णूशास्त्री पणशीकर यांचा जन्म 14 मार्च, 1931 रोजी मुंबईतील फणसवाडी येथे झाला. 'तो मी नव्हेच', 'थँक्यू मिस्टर ग्लाड', 'अश्रूंची झाली फुले' आदी

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG

श्री. पांडुरंग फुंडकर ......

नाटकातून प्रभाकरपंतानी रंगभूमीवर अढळ स्थान निर्माण केले. त्यांनी अभिनयाच्या 50 वर्षाच्या कारकिर्दीत 41 नाटकांचे 8,101 प्रयोग केले.

अभिनयातील प्रत्येक लहान मोठे डिटेल्स शिकविणारे शिक्षक, कोणत्याही बदलांना मोकळेपणाने सामोरे जाणारे अभिनेते आणि उभ्या महाराष्ट्राला अभिनयाचे वेड लावणारे अभिनयाचे विद्यापीठ म्हणजे प्रभाकर पणशीकर. जगात जिथे मराठी माणूस आणि मराठी भाषा पोहोचली आहे तिथे पंतांनी मराठी नाटक नेले. नाट्य संहितेतील वाक्य उच्चारण्याची त्यांची विशिष्ट पध्दत होती. त्यात लय असे. शब्दांना असलेले मानवी व्यक्तिमत्व व्यक्त करण्याची क्षमता त्यांच्या अभिनयात होती. लखोबा लोखंडेचा छद्मी चेहरा आणि प्रत्येक लांबलचक वाक्यानंतर "मी निपाणीचा तंबाखू व्यापारी आहे, तो मी नव्हेच" असे पंतानी म्हणावे आणि महाराष्ट्राने ते नाट्य काळजात साठवावे असा त्यांचा 50 वर्षाचा प्रवास झाला. रंगभूमीचे सर्व बारकावे ते सतत अभ्यासत असत. व्यवस्थापकाचा त्यांचा पिंड होता. कोणत्याही एखाद्या समारंभात बोलले तरी त्यातील शब्दांची नक्षी स्वरांच्या अंगाने जात असे. "जी मिट्टी असले पहाडी राजे निर्माण करते ती भूमी आम्हाला कदापि जिंकता येणार नाही" हे औरंगजेबाचे वाक्य पंत ज्या ढंगात म्हणत असत त्यामुळे मराठी संस्कृतीची रग आणखीच फुलत असे. त्यांच्या व्यक्तिमत्वात उत्साह आणि ऊर्जा सतत खेळत असे.

विद्यानंदाचा तू खरा पुत्र शोभतोस, विद्यानंदानी लावलेली रोपे या मातीत झडून गेली नाहीत. एक तरी वृक्ष मातीत रुजला, वाढला, आकाशाएवढा झाला. 'अश्रूंची झाली फुले' या नाटकातील विद्यानंद म्हणजे मराठी रंगभूमीवरील लोकशिक्षकच ठरला. लखोबा लोखंडे, दिवाकर दातार, दाजीशास्त्री दातार, कॅप्टन अशोक परांजपे, राधेश्याम महाराज अशा पाच भूमिका ज्या पध्दतीने महाराष्ट्राच्या गावागावात पंतांनी पोहोचविल्या त्यात त्यांची मराठी रंगभूमीवरील निष्ठा आणि रसिकांविषयीचा जिव्हाळा ठळक झाला.

वारा खात, गारा खात पणशीकर नावाचे घट्ट घट्ट गाठींचे बाभूळझाड अगदी गेल्या महिन्यापर्यंत उभे होते. अशा या ज्येष्ठ नाटककाराचे गुरुवार, दिनांक 13 जानेवारी, 2011 रोजी दु:खद निधन झाले.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

या सदनाचे सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांचे दु:खद निधन झालेले आहे. काही माणसे आपल्या कार्यकर्तृत्वातून समाजमनावर खोल ठसा उमटवितात की, तो ठसा काळालाही पुसून टाकता येत नाही असे गुरुजी म्हणून ओळखले जाणारे माळगा पंचक्रोशी एज्यूकेशन सोसायटीचे ते अध्यक्ष होते. देवगड तालुक्याच्या मोंडे गावात दिनांक 7.3.1941 रोजी जन्मलेले ॲड.गुरुनाथजी कुलकर्णी यांनी कायद्याची पदवी घेतल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयात वकिली केली होती. मराठी, इंग्रजी, हिंदी व गुजराथी या भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांचा अनेक सेवाभावी संस्थांशी संबंध होता. पक्षनिष्ठा व संघटनेशी असलेली बांधिलकी घट्ट ठेवणारे आणि राजकीय जीवनात तत्वाशी कधीही तडजोड न करणारे नेते अशी त्यांची प्रतिमा होती. सन 1969 पासून त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. सन 1971 ते 1973 पर्यंत नॅशनल स्टुडंटस् युनियनचे अध्यक्ष, सन 1972 ते 1977 पर्यंत मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीचे सह कार्यवाह, सन 1974 ते 1978 पर्यंत अखिल भारतीय युवक काँग्रेसचे सरचिटणीस, सन 1990 ते 1999 महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व सन 2002 मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर त्यांची निवड झाली होती.

स्व.ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी बर्लिन जर्मनी (पूर्व) येथील जागतिक युवक महोत्सवात प्रतिनिधीत्व केले होते. विधानपरिषदेमध्ये जनतेच्या विविध प्रश्नांना त्यांनी केवळ वाचाच फोडली नाही तर ते सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करीत असत. त्यांचा विविध सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांशी संबंध होता. स्व.ॲड.गुरुनाथजी कुलकर्णी हे स्वभावाने फटकळ होते, परंतु मनाने मात्र खूप प्रेमळ होते. सभापती महोदय, या सभागृहात अनेकदा तणावाची परिस्थिती निर्माण होत असे त्यावेळी सत्ताधारी पक्षात असतानाही तो तणाव ताबडतोब कसा निवळेल यासाठी ते सतत प्रयत्न करीत असत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेब आणि ॲड.गुरुनाथजी कुलकर्णी यांची मैत्री होती. मला सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांचे एक वाक्य आठवत आहे. माननीय श्री.गडकरी साहेब हे त्यांना नेहमी 'माय लर्नेड ॲडव्होकेट' असे संबोधत असत. पण स्व.गुरुनाथजी कुलकर्णी यांनी कधीही राग व्यक्त केला नव्हता. विरोधी पक्षातील सन्माननीय

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

सदस्यांशी त्यांची वागणूक नेहमी मैत्रीची, सौहार्दाची होती. असे एक मन मिळावू आणि या सभागृहात अत्यंत अभ्यासूवृत्तीने काम करणारे नेते आपल्यातून निघून गेले आहेत.

सभापती महोदय, कै.रमेश बालमुकुंदजी गुप्ता, माजी विधानपरिषद सदस्य यांचेही निधन झालेले आहे. या सर्व दिवंगत मान्यवरांना मी माझ्यावतीने, माझ्या पक्षाच्यावतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

------

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,.....

**सभापती** : कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये फक्त सदनाच्या सन्माननीय नेत्यांनी शोक प्रस्ताव मांडावा आणि फक्त सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी शोक प्रस्तावावर भावना व्यक्त कराव्या असा असा निर्णय झालेला आहे. त्याप्रमाणे सभागृहाच्या नेत्यांनी आणि सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्हाला सन्माननीय सदस्य श्री.उल्हास दादा पवार यांचे विचार ऐकावयाचे होते.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

**सभापती** : या सदनाचे नेते सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी भारतरत्न, स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी व ज्येष्ठ नाटककार श्री.प्रभाकर विष्णूशास्त्री पणशीकर तसेच ॲड.गुरुनाथ शांताराम कुलकर्णी, वि.प.स. व श्री.रमेश बालमुकुंदजी गुप्ता, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्याला सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी पाठिंबा दिलेला आहे. या प्रस्तावावर मी देखील माझे विचार व्यक्त करणार आहे.

भारतीय संगीताची ख्याती संपूर्ण जगामध्ये पोहोचविणारे व्यक्तिमत्व म्हणजे भारतरत्न, स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी हे होय. पंडित भीमसेन जोशी यांचे संपूर्ण जीवनमान पाहिले तर वयाच्या 11 व्या वर्षी ते घरातून बाहेर पडले आणि त्यानंतर आयुष्यभर संगीताच्या अभ्यासासाठी अनेक ठिकाणी वावरत राहिले.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

स्वरभास्कर जोशी यांचे गायन म्हणजे जगभरातील कोटयवधी संगीत रसिक जनतेची मने रिझविणारी एक महान शक्ती होती. त्यांच्या अभिजात ख्याल गायकीने भारतमातेच्या सांस्कृतिक श्रीमंतीला जणू सोनेरी किनार लाभली होती. शासत्रीय संगीतावर भीमसेनी मोहोर उठवत "माझे माहेर पंढरी" या अभंगातून त्यांनी घराघरात विठ्ठलाचे दर्शन घडविले तर "इंद्रायणी काठी देवाची आळंदी", "रम्य ही स्वर्गाहून लंका", "टाळ बोले चिपळीला नाच माझ्या संग", "मिले सुर मेरा तुम्हारा, तो सुर बने हमारा", अशा एकाहून एक गीतांनी राज्याच्या तसेच देशाच्या कानाकोप-यातील रसिकांच्या मनावर त्यांनी अधिराज्य केले. त्यांच्या जीवनामध्ये त्यांना विविध प्रकारचे राष्ट्रीय पुरस्कार देखील प्राप्त झालेले आहेत. संगीत क्षेत्रातील मोठ्या योगदानाबद्दल त्यांना "संगीत नाटक अॅकडमी पुरस्कार" देऊन तसेच जयपूर येथील गंधर्व महाविद्यालयाने त्यांना "संगीताचार्य", "पुण्यभूषण पुरस्कार", "स्वरभास्कर पुरस्कार", "तानसेन पुरस्कार" तसेच पुणे येथील टिळक विद्यापीठाने व गुलबर्गा विद्यापीठाने "डी.लिट. पदवी देऊन गौरविले. भारत सरकारने 1972 मध्ये "पद्मश्री", 1985मध्ये पद्मभूषण" व दिनांक 4 नोव्हेंबर 2008 रोजी सर्वोच्च मानाचा "भारतरत्न" किताब देऊन त्यांचा सन्मान केला. अशा या भारतपुत्राचे 24 जानेवारी 2011 रोजी दु:खद निधन झाले.

गेली जवळ जवळ 50 वर्षे आपल्या उत्कृष्ट अभिनयाने आणि अदाकारीने ज्यांनी 41 नाटकांचे 8101च्या वर प्रयोग करुन मराठी रंगभूमीची सेवा केली अशा कै पणशीकर यांनी मराठी रंगभूमीला दिलेल्या मोलाच्या योगदानाबद्दल त्यांना "नटवर्य दत्ताराम पुरस्कार", "जागतिक मराठी परिषद पुरस्कार", "नाट्यगौरव पुरस्कार", "संगीत नाटक अकादमी पुरस्कार", "नटसम्राट बालगंधर्व स्मृति पुरस्कार", "नटश्रेष्ठ केशवराव दाते पुरस्कार", आचार्य अत्रे पुरस्कार", महाराष्ट्र भूषण पुरस्कार "जीवन गौरव पुरस्कार" अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते. त्यांनी 1985मध्ये नागपूर व 1986मध्ये पुसद येथे झालेल्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपदही भूषविले होते. अशा या ज्येष्ठ नाटककाराचे गुरुवार, दिनांक 13 जानेवारी 2011 रोजी दु:खद निधन झालेले आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

या सदनातील आपल्या सर्वांचे जिवाभावाचे मित्र आणि अत्यंत तात्विक विचारांचे कार्यकर्ते कै.गुरुनाथ कुलकर्णी यांचे निधन ही खरे म्हटले तर आपणा सर्वांना धक्का देऊन गेलेली बाब आहे. इच्छाशक्ती असेल तर अनेक वेळा मृत्यूवरही मात करता येते अशा पध्दतीचे त्यांचे जीवन मी गेल्या दोन-तीन वर्षापासून पाहिलेले आहे. मधुमेहाच्या आजार असताना देखील केवळ प्रबळ इच्छाशक्ती होती म्हणून ते किमान दोन ते तीन वर्षे वाचू शकले असे माझे स्वत:चे मत आहे. गेली जवळ जवळ 35 वर्षे माझा आणि त्यांचा व्यक्तिगत संबंध होता. युवक काँग्रेस चळवळीतील अत्यंत धडाडीच्या आणि ध्येयवादी असलेल्या या तरुणाने नंतरच्या काळात मुंबई प्रदेश युवक काँग्रेस कमिटीचा अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचा अध्यक्ष, राष्ट्रवादी प्रदेश काँग्रेस कमिटीचा अध्यक्ष म्हणून काम केले. सदनामध्ये अत्यंत परखडपणे आणि पोटतिडिकेने बोलणारी व्यक्ती म्हणजे कै. गुरुनाथ कुलकर्णी. सदनामध्ये अशा प्रकारे बोलत असताना अनेक वेळा दोन्ही बाजूकडून शब्दांचे काही फवारे उडाले तरी नंतर लॉबीमध्ये गेल्यावर गुरुनाथ कुलकर्णी तितक्याच प्रेमाने सदस्यां बरोबर बोलत असत. खरे म्हटले तर ही त्यांची फार मोठी कला होती.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ KTG/ प्रथम श्री. शिगम 14:40

मा.सभापती....

कै. कुलकर्णी हे 2002 व 2008 असे दोन वेळा महाराष्ट्र विधानपरिषदेवर राज्यपालाव्दारे नामनियुक्त सदस्य म्हणून निर्वाचित झाले होते.

कै. गुरुनाथ कुलकर्णी हे या सदनात बोलत असताना तरुण कार्यकर्त्यांनी ध्येयनिष्ठ असणे, काहीही झाले तरी तत्वापासून यत्किंचितही बाजूला न होण्याची मानसिकता तयार करणे, सदनामध्ये असताना परखडपणे बोलायला शिकणे या पध्दतीने सभागृहामध्ये कोणत्याही विषयावर बोलत असताना कोकणाच्या विकासाच्या दृष्टीने त्यांनी आपली बाजू सभागृहात मांडली आहे. त्यावेळी ते सत्ताधारी पक्षाचे आहेत वा अन्य पक्षाचे आहेत असे न मानता कोकणाचे हित कसे होईल, कोकणाचा विकास कसा होईल या अनुषंगाने त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. दुर्देवाने अशा सर्वांच्या आवडत्या समाजसेवकाचे बुधवार, दिनांक 12 जानेवारी, 2011 रोजी दु:खद निधन झालेले आहे.

कै. रमेश बालमुकुंदजी गुप्ता यांचा जन्म 19 ऑक्टोबर, 1944 रोजी नागपूर जिल्ह्यात नरखेड येथे झाला. ते नगरखेड नगरपरिषदेचे सतत 25 वर्षे नगराध्यक्ष होते. 1991 मध्ये नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था मतदार संघातून महाराष्ट्र विधान परिषदेवर निर्वाचित झाले होते. अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे बुधवार, दिनांक 26 जानेवारी, 2011 रोजी दु:खद निधन झाले.

या सर्व दिवंगत सदस्यांना मी सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो. सर्व सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो.

( सदस्य उभे राहतात. )

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आता आपण कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेले उर्वरित कामकाज पूर्ण करुन घेऊ

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण सभागृहातील प्रथा आणि परंपरेप्रमाणे शोक प्रस्ताव संमत झाल्यानंतर सभागृहाचे कामकाज दहा ते पंधरा मिनिटांसाठी स्थगित करतो. परंतु तसे न करता आपण आजच्या कार्यक्रमपत्रिकेतील उर्वरित कामकाज पुकारत आहात...

**सभापती** : यासंबंधीच्या नियमामध्ये थोडी दुरुस्ती केली आहे. परंतु या ठिकाणी भावनेला हात घालणारा एखादा प्रश्न उपस्थित केला गेला तर मग अडचण येण्याची शक्यता आहे म्हणून मी सभागृहाचे कामकाज पंधरा मिनिटांसाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी 02.43 ते 02.58 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

---------

यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**
**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**हरकतीच्या मुद्यासंबंधी**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या राज्याचे मुख्यमंत्री कोण? असा मी आपल्या परवानगीने हरकतीचा मुद्दा उपस्थित करीत आहे. विधिमंडळ अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित केलेल्या चहापान कार्यक्रमास मी उपस्थित राहिलो नव्हतो. त्यामुळे मला या विषयाची फारशी माहिती नाही. परंतु या राज्यामध्ये दै."लोकमत" हे वृत्तपत्र किती कोटी लोक वाचतात हे मला माहित नसले तरी आजच्या दै.लोकमत वृत्तपत्रामध्ये जी बातमी छापून आली आहे ती मी आपल्या माहितीसाठी वाचून दाखवू इच्छितो. सोमवारपासून विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु होत आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आलेल्या चहापानाच्या कार्यक्रमास मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण, उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार, गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील, गृह राज्यमंत्री श्री.सतेज पाटील उपस्थित असल्याचे छायाचित्रासह प्रसिध्द झालेले आहे. चेहेरा दुसऱ्याच व्यक्तीचा दिसून येत असला तरी मुख्यमंत्री म्हणून नाव मात्र श्री.अशोक चव्हाणांचे नमूद केले आहे. यासंबंधी खुलासा होणे आवश्यक आहे. दै.लोकमत हे महाराष्ट्रातील सर्वाधिक खपाचे वृत्तपत्र आहे असे म्हटले जाते. त्यामुळे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री कोण? यासंबंधी कोट्यवधी लोकांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. आदरणीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांचा दै.लोकमत वृत्तपत्राशी संबंध असेलच. आजच्या दै.लोकमत वृत्तपत्रामध्ये छायाचित्र जे प्रसिध्द झाले आहे त्या अनुषंगाने असे नमूद केले आहे की, चहापान कार्यक्रमास मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण, उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार उपस्थित होते. यासंबंधी खुलासा झाला पाहिजे. वृत्तपत्र हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. छायाचित्रास अनुसरुन हा जो चुकीचा संदर्भ देण्यात आला आहे त्यामागे राजकीय डावपेच आहे असे मला वाटते.

**उप सभापती** : असे काही नाही. ही मुद्रणामध्ये झालेली चूक आहे.

श्री.दिवाकर रावते : संबंधित वृत्तपत्राच्या प्रतिनिधींना यासंबंधी खुलासा करण्याची आज्ञा द्यावी. या राज्याचे मुख्यमंत्री कोण आहेत हे राज्यातील जनतेला कळले पाहिजे.

**उप सभापती** : माननीय श्री.पृथ्वीराज चव्हाण हे या राज्याचे मुख्यमंत्री आहेत.

**-------------**

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे

प्रा.फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2011 चा अध्यादेश क्रमांक 8- महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) अध्यादेश, 2011 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवते.

**उप सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2011 चा अध्यादेश क्रमांक 9- महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, 2011 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन 2011 चा अध्यादेश क्रमांक 10- महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (सुधारणा) अध्यादेश, 2011 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन 2011 चा अध्यादेश क्रमांक 11-महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ अध्यादेश, 2011 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सन 2011 चा अध्यादेश क्रमांक 1 - महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, 2011 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

श्री. अजित पवार : सन 2011 चा अध्यादेश क्रमांक 5 - मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा (सुधारणा) अध्यादेश, 2011 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

श्री. अजित पवार : सन 2011 चा अध्यादेश क्रमांक 6 - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश 2011 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

श्री. अजित पवार : सन 2011 चा अध्यादेश क्रमांक 7 - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) अध्यादेश 2011 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सन 2011 चा अध्यादेश क्रमांक 3 - मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) अध्यादेश, 2011 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हरकतीच्या मुद्यासंबंधी

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हरकतीच्या मुद्याच्या माध्यमातून मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे की, घटनेच्या कलम 371 (2) अनुसार राज्यातील अनुशेषग्रस्त भागाकरिता माननीय राज्यपालांना विशेषाधिकार प्राप्त झालेला आहे. या निमित्ताने तत्कालीन माननीय जलसंपदा मंत्री श्री. अजितदादा पवार यांना मी मनापासून धन्यवाद देतो. कारण या राज्यातील अनुशेष दूर करण्याच्या दृष्टीने त्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केले आहेत. खास करुन विदर्भ आणि मराठवाडा या भागासंबंधी त्यांनी ही भूमिका घेतली आहे. मला माहीत आहे की, सध्याचे माननीय जलसंपदा मंत्री हे कोकण प्रदेशातूनच आलेले असल्याने त्यांनाही तत्कालीन जलसंपदा मंत्री श्री. अजितदादा पवार यांनी मार्गदर्शन केले असावे. त्या धोरणानुसार काम करीत असताना विदर्भ तसेच मराठवाड्याला आपण न्याय द्याल, अशी माझी खात्री आहे. आपणास कल्पना आहेच की, प्रा. बी.टी. देशमुख आता या सभागृहात उपस्थित नाहीत. ते सभागृहात सदस्य असताना अमरावती जिल्ह्यात जो सोफिया प्रकल्प येऊ घातलेला आहे त्याला त्यांनी व या भागातील जनतेने प्रखर विरोध केला होता. यासंदर्भात प्रा. बी.टी. देशमुख आणि मी माननीय श्री. अजितदादा पवार यांनी आयोजित केलेल्या बैठकीस उपस्थित होतो. त्या बैठकीत या विषयावर एक ते सव्वा तास चर्चा झाली होती. त्या चर्चेत, सोफिया प्रकल्पासाठी पाणी कोठून देता येईल, या भागातील अनुशेषाचा विचार करुन अमरावती किंवा नागपूरचे पाणी पुन्हा रिसायकल करुन देता येईल काय ? अशा वेगवेगळ्या मुद्यांवर देखील चर्चा झाली होती. यावरुन जनतेचा विरोध तत्कालीन जलसंपदा मंत्री श्री. अजितदादा यांनी मान्य केला होता, असे दिसून येते. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री यांनी या चार प्रकल्पांपैकी तीन प्रकल्प रद्द केले आणि या एका प्रकल्पाच्या बाबतीत नंतर निर्णय घेऊ, अशी माहिती दिली होती. हे सांगण्याचे कारण म्हणजे सोफिया प्रकल्पाच्या बाबतीत या भागातील लोकांच्या भावना जैतापूर येथे होणाऱ्या अणू ऊर्जा प्रकल्पाच्या बाबतीत असलेल्या भावनांपेक्षाही प्रक्षुब्ध आणि तीव्र आहेत. कारण जैतापूर प्रकल्पाच्या पूर्वीपासूनच हा प्रकल्प अमरावती विभागातील जनतेवर लादण्याचा प्रयत्न होत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

त्या ठिकाणच्या जनतेने या प्रकल्पाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात धाव धेतली व सर्वोच्च न्यायालयाचा निकाल जनतेच्या बाजूने लागण्याची आता शक्यता निर्माण झालेली आहे.

या सभागृहात अनुशेषाच्या संदर्भात घनघोर युध्द झाले होते. त्यावेळचे तत्कालीन अर्थमंत्री व आजचे ग्रामविकास मंत्री याच्यांबरोबर अर्थखात्याने लबाडी करुन अनुशेषग्रस्त भागांची रक्कम पळवली होती, ही रक्कम दुसरीकडे वापरण्यात आली होती तसेच यासंदर्भातील निदेश सुध्दा बदलविण्यात आले होते. अनुशेष ग्रस्त भागातील प्रकल्पांना मंजुरी द्यावयाची नाही परंतु पश्चिम महाराष्ट्रातील प्रकल्पांना तातडीने मान्यता कशी द्यावयाची याबाबत चर्चा देखील झाली होती. या विषयाच्या संदर्भात माननीय सभापतींच्या दालनात चर्चा देखील झाली होती. परंतु नंतर यासंदर्भातील जीआर आणि आदेश बदलविण्यात आल्यामुळे मला आणि आपल्या सर्वांना याबाबत आनंद झाला होता. या खात्याचा कारभार माननीय अजित पवार यांच्याकडे आल्याबरोबर त्यांनी अनुशेषग्रस्त भागाच्या संदर्भात चांगले काम केलेले आहे. या विषयाच्या संदर्भात दोन्ही बाजूच्या संदस्यांनी चांगले काम केलेले आहे. हा विषय पक्षीय नव्हता. या विषयाच्या संदर्भात काही वर्षापूर्वी आपल्याला विधानसभेचे अधिवेशन सुध्दा बोलवावे लागले होते हे आपण विसरलेलो नाही. अनुशेषग्रस्त भागाचा गळा घोटण्याचे काम थांबवण्यासाठी माननीय राज्यपाल श्री. पी.सी.अलेक्झांडर यांनी या विषयाच्या संदर्भात बैठका घेतल्या होत्या, निदेश दिले होते व कोणत्याही परिस्थितीत सरकारने सभागृहात अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी माननीय राज्यपालांना अनुशेषग्रस्त भागांना कशा प्रकारे रक्कमा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत ते दाखवावे लागत होते. त्यासंदर्भातील माननीय राज्यपाल महोदयांचे निदेश या सभागृहात ठेवले जात होते व त्यास पुरवणी सुध्दा जोडली जात होती. या विषयाच्या संदर्भात आपण सर्व साक्षीदार आहोत.

महत्तम अनुशेष ग्रस्त असा अमरावती जिल्हा असताना त्या ठिकाणच्या जनतेला त्या ठिकाणी सोफिया प्रकल्प नको अशी त्यांची मागणी असल्यामुळे हा विषय न्यायालयात नेण्यात आला. कलम 371(2) अनुसार माननीय राज्यपाल महोदयांना मुळात अंमलबजावणीचे अधिकारच नाहीत अशा प्रकारे घटनेला आव्हान देणारी ताकद या सोफिया कंपनीमध्ये कशी काय आली, हा महत्वाचा भाग आहे. सोफिया कंपनी ही एवढी मोठी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

लागून गेली आहे काय ? पुण्याच्या घोडेवाला हसन अलीला जसे मोकळे सोडून देण्यात आले होते तसे या प्रकरणामध्ये झालेले दिसते. घटनेला आव्हान देणारी याचिका न्यायालयात देण्यात आलेली आहे. या याचिकेचा काय तो निर्णय लागेलच. या याचिकेचा निर्णय करण्यास न्यायालय समर्थ आहे.

सभापती महोदय, या सदनात ॲडव्होकेट जनरलला एकदा नाही तर दोनदा बोलावण्यात आले होते. ॲडव्होकेट जनरलला सभागृहात बोलावण्याचा इतिहास आपण दोनदा घडवला आहे. ॲव्होकेट जनरल श्री. गुलाम वहानवटी त्यावेळेस ॲडव्होकेट जनरल होते. ते आता दिल्ली येथे कार्यरत आहेत. ॲडव्होकेट जनरलना सभागृहापुढे दोनदा आले व त्यांचे जे कायदेशीर मत होते ते त्यांनी सभागृहात स्पष्टपणे मांडले होते. ॲडव्होकेट जनरल यांनी सभागृहात जे मत मांडले होते ते सभागृहाच्या रेकॉर्डवर अजूनही आहे. त्यांनी माननीय राज्यपालाच्या अनुशेषाचा अधिकार मान्य केला होता. अशी परिस्थिती असताना या विषयाच्या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांना अधिकार आहेत की नाही, या विषयाच्या संदर्भात याचिका सादर करताना आमच्या ॲडव्होकेट जनरल यांनी उच्च न्यायालयामध्ये सरकारच्या वतीने अशी बाजू मांडली आहे की, "माननीय राज्यपालांना फक्त निदेश देण्याचे अधिकार असून अंमलबजावणी करण्याचा अधिकार माननीय राज्यपालांना नसून तो अधिकार केवळ सरकारलाच आहे". त्यामुळे हे ॲडव्होकेट जनरल, सोफिया कंपनी धार्जिणे आहेत. या ॲडव्होकेट जनरलनी या सदनाचा अवमान तर केलेलाच आहे, जनतेचा आणि घटनेचाही त्यांनी अवमान केलेला आहे. खरे म्हणजे मायबाप सरकारच्या बाजूने, जनतेच्या बाजूने विचार मांडावयाचे सोडून एका कंपनीच्या बाजूने विचार मांडण्याची भूमिका घेतली जाते ती योग्य नाही. त्यामुळे ॲडव्होकेट जनरलच्या संदर्भात आता गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

माननीय राज्यपालांनी या पुढे स्वतंत्र वकील करावा किंवा नाही हा नंतर चर्चेचा विषय होईल. माननीय मंत्र्यांकडून या ठिकाणी जलसंधारणाच्या संदर्भात अध्यादेश मांडण्यात येत असताना सदनामध्ये आपण ज्यावेळी चर्चा करतो आणि त्या चर्चेतून लोकांना न्याय देण्याकरिता सरकारला भाग पाडत असतो त्यावेळी सरकार जनतेचा सन्मान करीत असते त्याचवेळेला ॲडव्होकेट जनरल हे सर्वात जास्त अनुशेष असलेल्या अमरावतीकराचा घोर अपमान करणारे ॲफिडेव्हीट कसे काय करु शकतात, या संदर्भात शासनाने गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर पीठासीन अधिकारी म्हणून आपणही गंभीर दखल घेण्याची आवश्यकता आहे. हरकतीच्या मुद्याव्दारे माझा महत्वाचा मुद्दा असा आहे की, आपण या संदर्भात तातडीने हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. ॲडव्हाकेट जनरल यांनी घटनेला आव्हान देणा-या याचिकेच्या बाजूने अशा प्रकारे सरकारच्या वतीने प्रतिपादन करणे, हे कितपत योग्य आहे याची छाननी करणे आवश्यक आहे म्हणून या बाबतीत तातडीने आपला हस्तक्षेप होणे आवश्यक आहे. महाराष्ट्रामध्ये भ्रष्टाचाराचे अनेक प्रकार घडलेले आहेत आणि महाराष्ट्र भ्रष्टाचारात बुडालेला आहे हा नंतरच्या चर्चेचा विषय आहे परंतु सरकारच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात जाणारे वकील सुध्दा अशा प्रकारे करीत असतील आणि त्यांना जर कोणी पटवत असेल तर जनता खाईत बुडल्याशिवाय राहणार नाही. सर्वात जास्त अनुशेष असलेल्या अमरावतीवर आणि विदर्भावर घोर अन्याय करुन त्यांचा घोर अपमान करण्याचे जे कारस्थान रचले गेले आहे त्याचा पर्दाफाश आपल्या मार्फत झाला पाहिजे याकरिता पीठासीन अधिकारी म्हणून मी आपल्याला विनंती करतो की, या प्रकरणामध्ये आपण तातडीने लक्ष घालावे. अर्थात हे लक्ष कोणत्या पध्दतीने घालावयाचे हे आपणच ठरवावे. सरकारला याची जाणीव नाही असा मी आरोप करीत नाही. त्या ठिकाणी दोन वर्षे जे काम झालेले आहे त्याबद्दलच मी बोलत आहे. त्या अगोदरच्या संदर्भात मी बोलत नाही. विदर्भातील अनुशेषाच्या बाबतीत गळचेपी होणार असेल तर ती गंभीर घटना आहे त्यामुळे आंदोलनाची दिशा बदलेल म्हणून या

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते

प्रकरणामध्ये आपण तातडीने लक्ष घालावे आणि या संदर्भात लक्ष घालून जे काही करावयाचे आहे त्याबाबत योग्य ती दखल घ्यावी अशा प्रकारची मी आपल्याला विनंती करतो धन्यवाद.

**पृ.शी./मु.शी.** अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे ( पुढे चालू )

श्री.सुनील तटकरे (जल संपदा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चा अध्यादेश क्रमांक 2 - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, 2011 सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री.राजेश टोपे ( उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चा अध्यादेश क्रमांक 4 - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश,2011 सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी/.मु.शी**. सन 2010-2011 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे

श्री.अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010-2011 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2010-2011 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

**उप सभापती** : सन 2010-2011 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे. सदरहू पुरवणी मागण्यांच्या विवरणपत्राच्या प्रती सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या टपालखणामध्ये वितरित करण्यात येत आहेत.

- --

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी/.मु.शी** . हरकतीच्या मुद्यासंबंधी

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण या सभागृहाचे सन्माननीय सदस्यसुध्दा आहात . ज्यावेळी आपण पीठासीन अधिकारी म्हणून त्या आसनावर बसता त्यावेळी आपण नि:पक्ष असता, त्यावेळी आपण कोणत्याही पक्षाचे नसता. गेल्या महिन्यात मी वर्तमानपत्रात जे वाचले होते त्या बाबतीत मी मघाशी माननीय सभापती ज्यावेळी या आसनावर बसले होते त्याचवेळी बोलणार होतो. कॉग्रेस कमिटीवर सदस्य म्हणून माननीय सभापतींचे नाव जाहीर करण्यात आले असे मी वर्तमानपत्रात वाचले होते. मला याची खात्री आहे की, त्याला माननीय सभापतींनी संमती दिली नसेल किंवा त्यांना ते माहीतसुध्दा नसेल .

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

परंतु जनतेमध्ये वेगळे आणि या सभागृहामध्ये वेगळे धोरण ठरविण्यात आले आहे काय? आपण ज्यावेळी या सभागृहाच्या सर्वोच्च आसनावर बसता त्यावेळी आपण कोणत्याही पक्षाचे सदस्य नसता आणि नाही. सभापती महोदय, 1952 ते 1957 च्या विधानसभेच्या कालखंडामध्ये माझ्या आजोबांना पराजित करुन निवडून आलेले त्यावेळचे विधानसभेचे सन्माननीय अध्यक्ष श्री. नानासाहेब कुंटे यांना त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. मोरारजी देसाई यांनी कॉग्रेस पक्षाची बैठक सुरु असल्यामुळे आपल्या निवासस्थानी चर्चा करण्याकरिता बोलाविले होते. त्यावेळी सन्माननीय अध्यक्ष श्री. नानासाहेब कुंटे यांनी त्याला नकार देतांना असे म्हटले की, मी आता कॉग्रेस पक्षाचा नाही मी नि:पक्षपाती आहे. तुम्हाला जर माझ्याशी चर्चा करावयाची असेल तर माझ्या निवासस्थानी या, आपण त्याठिकाणी चर्चा करु. अशाप्रकारचा इतिहास, अशाप्रकारचा लौकिक आणि अशाप्रकारची परंपरा असलेल्या या महाराष्ट्र राज्यामध्ये वर्तमानपत्रवाले चुकीने काही छापत असतील तर ते बरोबर नाही. आता माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "दै.लोकमत" या वर्तमानपत्रामध्ये मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण असताना मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण असे चुकीचे छापले जात असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे जर हे देखील छापले गेले असेल तर माननीय सभापती या गोष्टीला संमती देणार नाहीत याची मला खात्री आहे किंवा ही बाब कुणीही त्यांच्या निदर्शनास आणून दिली नसेल. त्या दृष्टीकोनातून याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. भारताच्या घटनेवर अभ्यास केलेली डिग्री मी मिळविलेली नाही. किंवा घटनेमध्ये काही बदल करण्यात आला आहे काय याबाबत सुध्दा सभागृहाला माहिती मिळाली पाहिजे. या संदर्भात सभागृहामधील माझे वक्तव्य चुकीचे होत असेल तर मी माझे वक्तव्य मागे घेऊन सभागृहाची माफी मागेन. या सभागृहाला वेगळया परंपरा लाभल्या आहेत. या सभागृहाची असलेली उंची कमी करण्याचा काही विशिष्ट लोक प्रयत्न करीत असतील तर ते थांबविले पाहिजे, राज्याच्या हिताच्या दृष्टीने थांबविले पाहिजे. अशी या हरकतीच्या मुद्दयाव्दारे मी आपणास विनंती करीत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, वास्तविक हा एक वेगळया पध्दतीचा मुद्दा असल्यामुळे मी सुरुवातीलाच माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी उपस्थित केलेला हरकतीचा मुद्दा उपस्थित करणार होतो. परंतु या संदर्भात मला निश्चित असे लोकसभेमधून उद्या

DGS/

श्री. दिवाकर रावते....

किंवा परवा मार्गदर्शन मिळणार होते म्हणून मी थांबलो होतो. मी आज सभागृहाच्या कामकाजामध्ये भाग घेताना "राष्ट्रीय कार्यकारिणीचे चिटणीस आणि आमचे सभापती" असे बोलून सुरुवात करणार होतो. कारण पहिला देशाचा सन्मान केला पाहिजे आणि त्यानंतर महाराष्ट्राचा सन्मान केला पाहिजे अशी आपली शिकवण आहे. म्हणून आपण सुरुवातीला जय हिंद म्हणतो आणि त्यानंतर जय महाराष्ट्र म्हणतो. पहिल्यांदा मातृभूमीला वंदन करतो आणि त्यानंतर कर्मभूमीला वंदन करतो. आज सकाळी वि.स.पागे प्रतिष्ठानच्या कार्यक्रमामध्ये आपले भाषण संपवितांना नेहमी जय महाराष्ट्र म्हणणारे आमचे आदरणीय सभापती जय हिंद बोलले, ते जय महाराष्ट्र बोलले नाहीत. म्हणजे ते आता राष्ट्रीय नेते झाल्याची चुणूक त्यांनी आम्हाला करुन दिली हे मला लगेच जाणवले. आपण त्याबाबतचे रेकॉर्डींग तपासून पहावे. जर ते जय महाराष्ट्र बोलले असतील तर मी ताबडतोब लोटांगण घालून सभागृहाची माफी मागतो. अशाप्रकारे जय हिंद बोलून त्यांनी आपले राष्ट्रीयत्व प्रकट केले. मी याठिकाणी सर्व काही सांगत नाही, आपली राहिलेली टर्म माननीय मुख्यमंत्र्यांसाठी सोडून ते भारताचे महान सुपुत्र व कॉग्रेस पक्षाचे जुने जाणते सरचिटणीस श्री. अर्जुनसिंग यांच्या सर्वोच्च असलेल्या जागेवर जर जात असतील तर त्यांचा केवढा मोठा सन्मान आहे असे मला वाटत होते. म्हणून मी हा विषय याठिकाणी मांडीत नव्हतो. परंतु आज या सभागृहामध्ये माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना या सभागृहामध्ये निवडून आणण्यासाठी आपल्या पदाचा राजीनामा दिला असल्याचे मला समजले .

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

परंतु यांच्यातील एकही हौतात्म्य पत्करावयास सिध्द झाला नाही. सभापती महोदय, हा विषय गंभीर आहे, गमतीचा नाही. मला समजत नाही, पण याठिकाणी माननीय श्री.सोमनाथ चटर्जी यांच्या बाबतीत तुम्ही जुने उदाहरण दिले आहे.

काही सन्माननीय सदस्य (खाली बसून) : सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर पक्ष सोडून गेले.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर कुठे गेले ? त्यागाची किंमत नसते, तो मोजता येत नाही. याठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी निवडून यावे यासाठी आमदारकीचा त्याग करण्यासाठी एकही जण तयार नव्हता, एकही नाव जाहीर होत नव्हते. परंतु सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी माननीय श्रीमती सोनिया गांधी यांची भेट घेऊन राजीनामा देण्याची तयारी दाखविली, याला त्याग म्हणतात.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

सभापती महोदय,मी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना सांगू इच्छितो की, मी अत्यंत चांगल्या भावनेने बोलत आहे. तुम्ही अशी व्यवस्था केलेली आहे की, आम्हाला त्यांच्याकडे रागाने रोखूनही बघता येत नाही. माननीय श्री.सोमनाथ चटर्जी यांच्या बाबतीत संपूर्ण देशामध्ये इतिहास घडला आहे. जेव्हा अणुकराराच्या संदर्भात विषय उपस्थित झाला, तेव्हा त्यांना त्यांच्या पक्षाने राजीनामा देण्यास सांगितले. परंतु माननीय श्री.सोमनाथ चटर्जी यांनी राजीनामा दिला नाही. त्यांनी असे सांगितले की, "मी लोकसभेचा अध्यक्ष आहे, मी तुमच्या पक्षाचा सदस्य नाही." हे आपल्यासमोर काल-परवा घडलेले उदाहरण आहे. मला अशी शंका येऊ लागली आहे की, माननीय सभापती श्री.शिवाजीराव देशमुख यांना कारण नसताना बदनाम करण्याचा प्रकार चाललेला आहे. ते एक उत्कृष्ट सभापती आहेत. आता त्यांच्याबद्दल काय बोलावे याची मला चिंता वाटते. आम्हाला माननीय सभापती यांच्याबद्दल नुसता आदर नाही तर वडीलकीचा आदर आहे आणि यामध्ये ढोंगीपणा काहीही नाही. मग त्यांना "आदर्श" बोलले तरी राग येतो. मग आम्ही काय करावयाचे असा प्रश्न आहे. आम्ही नुसते "आदर्श" बोललो तरीही त्यांना वाईट वाटते. त्यामुळे माननीय सभापतींबद्दल कोणत्या भावना व्यक्त करावयाच्या याबद्दल आमच्या मनामध्ये कधी-कधी शंका निर्माण होते. माझा प्रश्न असा आहे की, आपल्या सर्वांच्या समोर माननीय श्री.सोमनाथ चटर्जी यांचे काल-



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

परवाचे घडलेले उदाहरण आहे. त्यामुळे कॉंग्रेस पक्षाला माननीय सभापती यांना बदनाम करण्याचे काहीच कारण नव्हते.हा विषय आमच्या माननीय सभापतींच्या संबंधातील नाही. कारण त्यांच्या कडून असे कधीही जाहीर करण्यात आलेले नाही की, मी सदरहू पद स्वीकारलेले आहे आणि त्याचा मला अभिमान वाटतो. मी धन्य झालो आहे किंवा पुष्पगुच्छ वगैरे दिला असे काही घडलेले नाही. तेव्हा हा पक्षाचा विषय आहे. माननीय सभापती हे आमचे आहेत, ते तुमच्यासाठी कोणी नाहीत. ते आमच्या सदनाचे आणि आमचे सभापती असून, कॉंग्रेस पक्ष त्यांची बदनामी थांबविणार आहे काय असा मी कॉंग्रेस पक्षाला प्रश्न विचारीत आहे.आमच्या माननीय सभापतींची अशा प्रकारे बदनामी होणार नाही याची आपण काळजी घेतली पाहिजे. त्यांनी खुलासा करावा. आमची हरकत नाही. जर त्यांनी खुलासा केला तर जो काही विषय असेल त्याबद्दल ते सांगतीलच. परंतु या बाबतीत लोकसभेतील सन्माननीय अध्यक्ष श्री.सोमनाथ चटर्जी यांचे उदाहरण आहे.त्यामुळे आपण सदरहू विषय राखून ठेवलात तर त्यासंबंधी माझ्याकडे जे काही टिपण येईल ते मी येथे वाचून दाखवीन. धन्यवाद.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी असा मुद्दा उपस्थित केला की,सन्माननीय विधान परिषदेचे सभापती श्री.शिवाजीराव देशमुख साहेब यांची कॉंग्रेस पक्षातील वरिष्ठ पदावर म्हणजे सी.डब्ल्यू.सी.वर नियुक्ती झालेली आहे.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : सी.डब्ल्यु.सी.म्हणजे काय ?

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना माहिती असावयास पाहिजे.सगळया जगाला माहिती आहे,मग सन्माननीय सदस्यांना कसे माहिती नाही? कॉंग्रेस वर्कींग कमिटीच्या वरिष्ठ पदावर सन्माननीय सभापती श्री.शिवाजीराव देशमुख साहेब त्यांची नियुक्ती करुन कॉंग्रेस पक्षाने त्यांचा सन्मान केलेला आहे.याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, सन्माननीय सभापती श्री.शिवाजीराव देशमुख हे आम्हाला वडीलांच्या ठिकाणी असून,एक आदरणीय आहेत. आपल्याला सर्वांना त्यांच्याबद्दल विश्वास आहे की,सन्माननीय श्री.शिवाजीराव देशमुख हे सदनामध्ये सभापती स्थानावर बसलेले असताना कोणत्याही पक्षाच्या कोणत्याही सन्माननीय सदस्यांवर अन्याय होणार नाही ही बाब ते निश्चितपणे पहातील आणि त्याबाबत आपल्या कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही असे मला वाटते. याठिकाणी सी.डब्ल्यु.सी.वर निमंत्रित सदस्य म्हणून

. . . .एन-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

त्यांची नियुक्ती करुन काँग्रेस पक्षाने खऱ्या अर्थाने त्यांचा सन्मान केलेला आहे. आपल्या सदनाचे माननीय सभापती यांना एक वरिष्ठ पद मिळालेले आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे....
त्याबद्दल आपण सर्वांनी त्यांचे स्वागत करावयास पाहिजे. परंतु माननीय सभापतींचे स्वागत करण्या ऐवजी काँग्रेस पक्षाने त्यांचा सन्मान केला म्हणून वेगळया प्रकारची भाषा वापरण्यात येत आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, माननीय सभापती पक्षाच्या बैठकीला सुध्दा उपस्थित राहू शकत नाहीत असे असताना या ठिकाणी चुकीचे रेकॉर्ड होत आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय. चुकीच्या पध्दतीने हा विषय या सभागृहात उपस्थित करण्यात आलेला आहे. काँग्रेस पक्षाने माननीय सभापतींना काँग्रेस वर्किंग कमिटीमध्ये निमंत्रित म्हणून नियुक्त केल्यामुळे माननीय सभापतींचा खऱ्या अर्थाने सन्मान करण्यात आलेला आहे त्याबद्दल संपूर्ण सभागृहाने त्यांचे अभिनंदन करावयास पाहिजे आणि तसा प्रस्ताव या ठिकाणी आणला पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी या संदर्भात लोकसभेचे दाखले सादर करणार आहे तोपर्यंत माननीय सभापतींनी आपला निर्णय राखून ठेवावा.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य जयंत पाटील तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो पूर्ण तपासल्या शिवाय मी त्यासंबंधीचा निर्णय देऊ इच्छित नाही. मी तो मुद्दा पूर्णपणे तपासून घेईन आणि त्यानंतर त्यासंबंधीचा निर्णय देईन.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

**पृ. शी. / मु. शी.** : विधेयकांना संमती व अधिसंमती

**उप सभापती** : दोन्ही सभागृहाद्वारे पारित केलेल्या विधेयकांना राज्यपाल व राष्ट्रपती यांची अधिसंमती मिळाल्याची यादी सह सचिव वाचून दाखवतील.

सह सचिव : राष्ट्रपतींनी पुढील विधेयकाला अधिसंमती दिली आहे.

सन 2010 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 5 - वेतन प्रदान व किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2010.

राज्यपालांनी पुढील विधेयकांना अधिसंमती दिली आहे.

1) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 74 - महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (तिसरी सुधारणा) विधेयक, 2010.
2) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 76 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना ( सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, 2010.
3) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 78 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना ( सुधारणा ) विधेयक, 2010.
4) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 79 - मुंबई मोटार वाहन कर (दुसरी सुधारणा) विधेयक, 2010.
5) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 80 - महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, 2010.
6) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 81 - मुंबई करमणूक शुल्क (दुसरी सुधारणा) विधेयक, 2010.
7) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 82 - मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) विधेयक, 2010.
8) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 88 - मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक, 2010.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सह सचिव....

9) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 90 - महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते. महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक, 2010.

10) सन 2010 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 10 - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, 2010.

11) सन 2010 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 12 - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, 2010.

12) सन 2010 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 13 - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, 2010.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सभापती तालिका नामनिर्देशित करणे.

**उप सभापती** : मी विधान परिषद नियमातील नियम 8 (1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित केल्याचे घोषित करतो :-

1) श्री. मोहन जोशी
2) ॲड. उषा दराडे
3) श्री. परशुराम उपरकर
4) श्री. रामनाथ मोते

---

**उप सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 15 मार्च, 2011 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक 3 वाजून 32 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 15 मार्च, 2011 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही